2022 IV 04 - 1030
२०२२ . ०४ . ०४ - १०३०

N 761

Seat No.
बैठक क्र.

Time : 2 Hours
वेळ - २ तास

SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER-II (M)
सामाजिक शास्त्रे (७३) भूगोल पेपर-२ (म)

(REVISED COURSE)

Pages - 7
पृष्ठे - ७

Total Marks : 40
एकूण गुण - ४०

सूचना :—

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या भारताच्या नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(4) *प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(5) *नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*

(6) *प्रश्नांची उत्तरे देतांना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

(7) *प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत.*

(8) *शिसपेन्सिल वापरण्यास हरकत नाही. रंगीत पेन्सिलचा उपयोग आकृत्या, आकृत्या आराखडे, नकाशा कार्य इत्यादीसाठी करावा.*

(9) *पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

1. दिलेल्या पर्यायापैकी योग्य ते पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा : 4

(1) भारताचे स्थान पृथ्वीवर .... गोलार्धात आहे.

(i) उत्तर व पूर्व

(ii) दक्षिण व पश्चिम

(iii) उत्तर व पश्चिम

(iv) दक्षिण व पूर्व

(2) ब्राझीलमध्ये आग्नेय तसेच ईशान्य दिशेकडून येणाऱ्या .... वाऱ्यांपासून पाऊस पडतो.

(i) मान्सूनवारे

(ii) पूर्वीय (व्यापारी)

(iii) प्रतिव्यापारी

(iv) आवर्त

(3) भारत व ब्राझील या दोन्ही देशाची अर्थव्यवस्था .... प्रकारची आहे.

(i) अविकसित

(ii) विकसित

(iii) अतिविकसित

(iv) विकसनशील

(4) ब्राझीलचा सर्वाधिक भूभाग ....

(i) मैदानी प्रदेश आहे

(ii) उच्चभूमीचा आहे

(iii) पर्वतीय आहे

(iv) विखंडित टेकड्यांचा आहे

https://www.maharashtrastudy.com

2. योग्य जोड्या जुळवा : 4

'अ' स्तंभ	'ब' स्तंभ
(1) क्षेत्रभेट	(*i*) पर्यटन स्थळ
(2) पिको दी नेब्लीना	(*ii*) गोवा
(3) सर्वाधिक नागरीकरण	(*iii*) नमुना प्रश्नावली
(4) रिओ दी जनेरिओ	(*iv*) हिमाचलप्रदेश
	(*v*) ब्राझीलमधील सर्वोच्च शिखर

3. *एका* वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही *चार*) : 4

(1) ब्राझीलमधील पर्जन्यछायेच्या प्रदेशाला कोणत्या नावाने संबोधतात ?

(2) ब्राझीलमधील लोकप्रिय खेळ कोणता ?

(3) भारतातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठे राज्य कोणते ?

(4) भारताची प्रमाणवेळ कोणत्या रेखावृत्तावरून निश्चित केली जाते ?

(5) भारतातील शेती ही मुख्यत्वे कोणत्या प्रकारची आहे ?

4. (अ) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा तसेच त्यांचे नावे द्या व चिन्हांची सूची द्या (कोणतेही *चार*) : 4

(1) सिक्कीम

(2) लक्षद्वीप बेटे

(3) चेन्नई बंदर

(4) आॅसाममधील खनिज तेलक्षेत्र—दिग्बोई

(5) दक्षिण भारतातील सर्वाधिक लोकसंख्या घनतेचे राज्य

(6) कर्कवृत्त.

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

(आ) दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही *चार*) : 4



प्रश्न :

(1) ब्राझीलमधील कोणतेही दोन वनप्रकार सांगा.

(2) नकाशात दर्शविलेले बेट कोणते ?

(3) नकाशात मगर कोठे आढळते ?

(4) तामरिन हा प्राणी कोठे आढळून येतो ?

(5) नकाशातील दक्षिणेकडील गवताळ प्रदेश कोणता ?

https://www.maharashtrastudy.com

5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) : 6

(1) भारतात पानझडी वने आढळतात.

(2) ब्राझीलमध्ये पर्यावरणस्नेही पर्यटनाचा अधिक विकास केला जात आहे.

(3) भारताच्या अर्थव्यवस्थेत मत्स्य व्यवसायाची भूमिका महत्त्वाची आहे.

(4) ब्राझीलच्या अंतर्गत भागातील खाणकाम व्यवसायाच्या विकासावर मर्यादा आल्या आहेत.

6. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे स्तंभालेख काढा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

ब्राझील—नागरी लोकसंख्येची टक्केवारी

(1960 ते 2010)

वर्षे	नागरी लोकसंख्येची टक्केवारी
1960	47.1
1970	56.8
1980	66.0
1990	74.6
2000	81.5
2010	84.6

प्रश्न :

(1) वरील आलेख काय दर्शवितो ?

(2) कोणत्या दशकात नागरीकरणाचा वेग कमी झालेला दिसतो ?

(3) 1980 ते 1990 या दशकात नागरी लोकसंख्येत किती टक्क्याने वाढ झाली आहे ?

P.T.O.

https://www.maharashtrastudy.com

किंवा

(आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

आयुर्मान :





प्रश्न :

(1) 2016 ला भारतातील सरासरी आयुर्मान किती ?

(2) 1990 मध्ये ब्राझीलमधील सरासरी आयुर्मान भारतापेक्षा कितीने जास्त आहे ?

(3) 1980 मधील भारतातील सरासरी आयुर्मान हे ब्राझीलमध्ये कोणत्या वर्षी होते ?

https://www.maharashtrastudy.com

(4) 2010 ते 2016 या कालावधीत सरासरी आयुर्मानातील वाढ कोणत्या देशात जास्त आहे ?

(5) कोणत्या देशात सरासरी आयुर्मान जास्त आहे ?

(6) 1960 मध्ये भारताचे आयुर्मान ब्राझीलपेक्षा किती वर्षांनी कमी होते ?

7. **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** 8

(1) तुम्ही क्षेत्रभेटीत सहभागी होणार असाल तर कशी तयारी कराल ? वन क्षेत्रास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.

(2) भारत व ब्राझील या देशातील हवामानाची तुलना करा.

(3) भारताच्या मैदानी प्रदेशाची वैशिष्ट्ये कोणती ?

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com